* माहितीस*

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

३०/०७/१९

## खाकी वर्दीतील सामाजिक दायित्व जिल्हा पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी.

जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी यांनी वाशिम जिल्हयाचा प्रभार हाती घेतल्यानंतर अनेक वैविध्यपुर्ण कार्यक्रम हाती घेतले. खाकी वर्दीतील सामाजिक दायित्व म्हणजे वसंत परदेशी यांच्या बद्दल लिहायचे झाल्यास ...एक वाक्य यांना पुर्ण पणे लागु होते ते म्हणजे, ज्या समाजात आपला जन्म झाला. त्या समाजाचे ऋण फेडणे हे आपले आदय कर्तव्य आहे. याची ज्या माणसाला असते ती माणसे ते नेहमी सकारात्मक दृष्टीने सर्व समाजासाठी काम करतात. त्यांच्या सामाजिक कार्याची कोणी दखल घेवो अथवा न घेवो याची पर्वा न करता आपल्या हातुन समाजाचे व जनतेचे चांगले कार्य घडो अश्या भावनेने झपाटलेले अधिकारी समाजात व प्रशासनात फार कमी व बोटावर मोजण्या इतपत कमी असतात. आपल्या व आपल्या आसपास समाजात बरे वाईट वागणाऱ्याची परिस्थिती नेहमी डोळया समोर ठेऊन समाजमनासाठी अहोरात्र आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठ राहुन सर्व समाजामध्ये जातीय सलोखा, व समाजात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावे या नितांत उददेशाने सर्व धर्म सम भाव ही भावना आपल्या उराशी बाळगुन व गुन्हेगारी वृत्तीला कर्दनकाळ ठरलेले परंतु मनाच्या कोपऱ्यात गुन्हेगार हा सुध्दा सर्व सामान्य माणसाचे जीवनमान जगला पाहिजे व गुन्हेगारी वृत्ती पासुन मुक्त होऊन चांगल्या उदरनिर्वहाला लागला पाहिजे हा उददेश घेऊन याच हेतुने गेल्या सहा महिन्यापासुन वाशिम सारख्या मागास जिल्हयात सामाजिक कार्याचा ध्यास घेऊन जिल्हयातील सर्व जनतेच्या जीवनात सुख समृध्दी कायम नांदावी व जिल्यात जातीय सलोख्याचे समतोल नेहमी कायम राहावे म्हणुन ईद ए मिलन सारखे सामाजिक कार्यक्रम हाती घेतले. व आपल्या महत्वपुर्ण भाषणातुन मी प्रथम भारतीय आहे. व शेवटी ही भारतीय आहे असा संदेश देत मानव सेवा हीच ईश्वर सेवा सोबत पुर्थ्वी तलावरील मनुष्याने जाती पातीत स्वतःला अडकुन न ठेवता सामाजिक कार्याला आपल्या आयुष्यात महत्व दया. कायदा व सुव्यवस्था समाजात अबाधित ठेवण्यात साठी पोलीस प्रशासनाला मदत करा. समाजात वावरत असताना जातीय तेढ निर्माण करणाऱ्या वृत्तीला वेळीच आळा घालण्यासाठी पोलीस दलाला सहकार्य करा असे मोलाचे आवाहन केले. वाशिम पोलीस दलात सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रिद वाक्य जणु यांनाच शोभेल असे कर्तव्यदक्ष जिल्हा पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी हे जिल्हा पोलीस अधिक्षक म्हणुन जनतेच्या सेवेत रुजु झाले. यांनी या सहा महिन्याच्या सेवाकाळात आपल्या चांगल्या कार्याची पावती जनतेला दिली: ते मी आणि माझे पोलीस खाते किंवा मी व माझा परिवार यावरच न थांबता, हा वाशिम जिल्हा माझा आहे. मी या जिल्हयाच्या परिवारातील एक सदस्य आहे आणि एक प्रकारे मी या जिल्हयाचा वरिष्ठ अधिकारी म्हणुन मला जिल्हयासाठी काही सामाजिक कार्य करावेच लागले याची आपुलकीने जाण ठेवुन व त्याना या कामा विषयी शासनाचा कोणताही आदेश नसताना फक्त सामाजिक कार्याची आवड म्हणुन वाशिम जिल्हयाचा शैक्षणिक दर्जा वाढला पाहिजे, जिल्हयात निसर्गाचा समतोल कायम राहावा म्हणुन जास्तीत जास्त झाडे लावुन त्यांचे संगोपन करा लोकांना पाणी अडवा पाणी जिरवा याचे महत्व पटवुन दयावे अशा संकल्पना जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे अधिकारी यांना मिटिंग दरम्यान बोलुन दाखविल्या.

मा. पोलीस अधिक्षक वसंत परदेशी यांनी त्यांची संकल्पना बोलुन दाखविताचा उत्साही ठाणेदार यांनी दत्तक ग्राम योजनेची संकल्पना अमलात आणुन सामाजिक दायित्व म्हणुन वाशिम ग्रामीण ठाणेदार यांनी हददीतील ग्राम कुंभारखेडा, आसेगाव ठाणेदार यांनी ग्राम हिवरा खुर्द, जऊळका ठाणेदार यांनी ग्राम वडी, मालेगाव ठाणेदार यांनी ग्राम कळंबेश्वर, अनसिंग ठाणेदार सोनगव्हाण, धनज ठाणेदार यांनी ग्राम ब्राम्हणवाडा, रिसोड ठाणेदार यांनी ग्राम कुऱ्हा, कारंजा ग्रामीण यांनी शहा, हे गाव दत्तक घेतले. दत्तक ग्राम योजने अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले त्यात वृक्षारोपण, विदयार्थांना शालेय साहित्य वाटप, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, ग्राम स्वच्छता अभियान, जल युक्त शिवारादरम्यान श्रमदानाचे आयोजन करण्यात आले, तंटामुक्ती गाव योजने बाबत मार्गदर्शन व्यसनमुक्ती शिबीर, आरोग्य शिबीर, एक गाव एक गणपती उपक्रम व ध्वनीप्रदुषण पर्यावरण संरक्षणाबाबत माहिती दिली. वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने खास युवावर्गासाठी पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण सुरु करुन पोलीस भर्ती मध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या तरुण तरुणीनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांनी तरुण पिढीला केले आहे. जिल्हयातील जनता या सामाजिक दायित्वाच्या हाकेला हाक दिल्या शिवाय राहणार नाही. सर्वच स्तरावरुन या सामाजिक कार्यात आपला सहभाग नोंदवेल असा विश्वास पोलीस दलाकडुन व्यक्त केला जात आहे.

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम